

# वैद्यकीय गर्भपात कायदा

## महाराष्ट्रातील सेवा पुरवठादारांकरिता मार्गदर्शिका

Cehat

Centre for Enquiry Into Health and Allied Themes

# वैद्यकीय गर्भपात कायदा

## महाराष्ट्रातील सेवा पुरवठादारांकरिता मार्गदर्शिका

सहत

सेंटर फॉर इनक्वायरी इनटू हेल्थ अँड अलाईड थीम्स

मुंबई

प्रकाशन : डिसेंबर, २००९

प्रकाशक :
**सेहत (सेंटर फॉर इनक्वायरी इनटू हेल्थ अँड अलाईड थीम्स)**
सर्व्हे नं. २८०४-२८०५,
आराम सोसायटी रोड,
वाकोला, सांताक्रूझ (पू.), मुंबई-४०० ०५५.
फोन : २६६७३१५४ • २६६७३५७१
फॅक्स : २६६७३१५६
**E-mail :** cehat@vsnl.com
**Website :** www.cehat.org

या पुस्तिकेवर कोणाचाही कॉपी राईट नाही. कोणत्याही भागाचं पुर्नमुद्रण, (व्यावसायिकरणा व्यतिरिक्त) आपण जरुर करावं. तथापिचा आणि चित्रकाराचा नामनिर्देश करावा तसेच पुस्तिकेबद्दलचा आपला अभिप्राय व पुस्तिकेचा आपण केलेला उपयोग मात्र आम्हाला जरुर कळवावा.

संकलन : **दिव्या पटेल, लेनी चौधरी, उज्ज्वला म्हात्रे**

अनुवाद : **अश्विनी जोग**

मुद्रक : **साटम उद्योग**
परेल, मुंबई-४०० ०१२.

**प्रस्तावना :**

भारतामध्ये वैद्यकीय गर्भपात कायदा १० ऑगस्ट १९७१ मध्ये संमत करण्यात आला. हा कायदा संपूर्ण देशाला लागू करण्यात आला होता, फक्त जम्मू व काश्मीर सोडून, जिथे तो १९८० पासून संमत झाला. या कायद्यामध्ये २००२ साली सुधारणा करण्यात आली व त्याचे वैद्यकीय गर्भपात (सुधारित) कायदा, २००२ असे नामकरण करण्यात आले. सुधारित नियम व मार्गदर्शक तत्त्वे २००३ मध्ये जारी करण्यात आले.

**चौकट १ घटनांचा कालक्रम**

| | |
|---|---|
| १९७१ : | गर्भपात कायदा संमत |
| १९७२ : | जम्मू काश्मीर, मिझोराम, सिक्कीम व लक्षद्विप वगळता अन्य २२ राज्ये व ९ केंद्रशासित प्रदेशांमध्ये कायद्याची अंमलबजावणी जारी |
| १९७५ : | गर्भपात नियमांची आखणी |
| १९८० : | जम्मू व काश्मीर व मिझोराममध्ये गर्भपात कायदा लागू. सिक्कीम व लक्षद्विपमध्ये आजही गर्भपाताच्या कायद्यांचे स्वरूप मर्यादित आहे. |
| २००२ : | गर्भपात कायदा (सुधारित) |
| २००३ : | गर्भपाताचे सुधारित नियम व मार्गदर्शक तत्त्वे जारी |

संसाधन : हिरवे एस. ॲबॉर्शन पॉलिसी इन इंडिया : लॅक्युने ॲड फ्युचर चॅलेंजेस. ॲबॉर्शन असेसमेंट प्रोजेक्ट-इंडिया, सेंटर फॉर एन्क्वायरी इंटू हेल्थ अँड अलाईड थिम्स व हेल्थवॉच ट्रस्ट, २००२

गर्भपाताचे नियम केंद्रशासनाने तयार केले असले तरी संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर त्यांची मांडणी करण्यात आली होती. तसेच मार्गदर्शक तत्त्वे राज्य शासनाने तयार केली आहेत व त्यामध्ये गर्भपाताकरिता आवश्यक निदान, नोंदी व गोपनीयतेसंबंधीच्या बाबी हाताळल्या गेल्या आहेत.

गर्भपात जर या कायद्याच्या तरतुदी अंतर्गत व कल्याणात्मक उद्दिष्टांनी केला गेला असेल तर गर्भपात करून घेणाऱ्या स्त्रीस कोणत्याही प्रकारची हानी किंवा इजा झाल्यास त्याविरुद्ध केलेल्या कायदेशीर किंवा दंडात्मक कारवाईपासून नोंदणीकृत डॉक्टरांना पूर्ण संरक्षण देण्यात आले आहे.

सर्व वैद्यकीय व आरोग्य सेवा पुरवठादारांना गर्भपात कायद्याची व भारतामध्ये स्त्रियांना सुरक्षित व कायदेशीर गर्भपाताची सेवा मिळण्याकरिता आवश्यक परिस्थितीची माहिती देणे हे या पुस्तिकेचे उद्दिष्ट आहे.

## १. वैद्यकीय गर्भपात कोणाला करून घेता येतो?

गर्भधारणेच्या १२व्या आठवड्यापर्यंत एका डॉक्टरकडून व १२ तो २० आठवड्यापर्यंत किमान दोन नोंदणीकृत डॉक्टरांकडून खालील प्रकारचे निदान करण्यात आले तर गर्भधारणेच्या २०व्या आठवड्यापर्यंत गरोदर स्त्रीला गर्भपात करून घेण्याची परवानगी वैद्यकीय गर्भपात (सुधारीत) कायदा, २००२ अंतर्गत देण्यात आलेली आहे.

- स्त्रीच्या जिवाला धोका असल्यास किंवा त्या गरोदरपणामुळे त्या स्त्रीच्या मानसिक किंवा शारीरिक आरोग्याला धोका पोहोचणार असल्यास.
- जन्माला येणाऱ्या मुलास शारीरिक तसेच मानसिक व्यंग असण्याचा धोका असल्यास.
- गर्भधारणा ही बलात्कारामुळे किंवा लैंगिक अत्याचारांमुळे झालेली असल्यास.
- विवाहित स्त्रीच्या बाबतीत गर्भधारणा ही गर्भनिरोधकांच्या अयशस्वी वापरामुळे झालेली असल्यास.

## २. वैद्यकीय गर्भपाताकरिता कोणाची संमती आवश्यक असते?

गर्भपात कायद्यानुसार गर्भपाताकरिता कोणत्याही तिसऱ्या व्यक्तिच्या (उदाहरणार्थ पती किंवा कुटुंबातील अन्य व्यक्ति) संमतीची गरज नसते. फक्त १८ वर्षाहून कमी वय असलेल्या किंवा मानसिक आजार असलेल्या स्त्रीच्या गर्भपाताकरिता तिच्या पालकांची/सांभाळ करणाऱ्यांची लेखी परवानगी आवश्यक असते. संमतीपत्राचा नमुना अर्ज "क" मध्ये दिला आहे.

## ३. वैद्यकीय गर्भपात कोणाकडून करून घेता येतो?

२० आठवड्यापर्यंतचा गर्भपात राज्य वैद्यकीय नोंदणी पुस्तकात नोंद असलेल्या व खालीलपैकी कोणतीही एक पात्रता असलेल्या वैद्यकीय व्यावसायिकाकडून करून घेता येतो:

१. स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र शाखेमध्ये किमान सहा महिन्याकरिता शल्यचिकित्सक कामामध्ये हाऊसमनशिप केलेले एम.बी.बी.एस. डॉक्टर.

२. रूग्णालयातील स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र शाखेमध्ये एक वर्षाहून अधिक कामाचा अनुभव असलेले एम.बी.बी.एस. डॉक्टर.

३. स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्रामध्ये पदव्युत्तर शिक्षण किंवा पदविका घेतलेले व या प्रशिक्षणा दरम्यान कामाचा अनुभव असलेले वैद्यकीय व्यावसायिक.

४. हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी राज्य नोंदवहीत नोंदणी झालेल्या वैद्यकीय व्यावसायिकांकरता स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र शाखेमधील कामाचा अनुभव तीन वर्षाहून कमी नसावा. सरकारने स्थापन केलेल्या अथवा चालवलेल्या रूग्णालयात किंवा मान्यताप्राप्त प्रशिक्षण केंद्रात नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाच्या हाताशी किमान २५ गर्भपातांमध्ये सहाय्यक म्हणून व त्यातील किमान ५ गर्भपात स्वतंत्रपणे हाताळले असलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांना १२ आठवड्यापर्यंतचे गर्भपात करता येतील.

## ४. वैद्यकीय गर्भपात कोठे केला जाऊ शकतो?

सरकारने स्थापन केलेल्या अथवा चालवलेल्या दवाखान्यात किंवा सरकारने किंवा जिल्हा

समितीने मान्यता दिलेल्या ठिकाणी गर्भपात केला जाऊ शकतो. महाराष्ट्रामध्ये या सर्व केंद्रांची नोंदणी बॉम्बे नर्सिंग होम नोंदणी सुधारित कायदा २००५ अंतर्गत करणेदेखील आवश्यक असते.

**५. मान्यता मिळण्याकरिता कोणत्या बाबी आवश्यक असतात?**

- **१२ आठवड्यापर्यंतच्या गर्भपातासाठी:**
  - गर्भपात करणाऱ्या सर्व सेवा पुरवठादारांकडे रूग्णांना दाखल करून घेण्याची सोय व रूग्णालय आणि शस्त्रक्रिया कक्षाची स्वच्छता राखण्याची सोय असणे जरुरी आहे.
  - स्त्री चिकित्सेसाठी/ परीक्षणासाठी/ प्रसूतीसाठी लागणारे टेबल
  - भूल देण्यासाठी व पुन्हा शुद्धीवर आणण्यासाठी लागणारी साधने व
  - निर्जंतुकीकरणासाठी लागणारी साधने, उदाहरणार्थ ऑक्सिजन सिलिंडर, शोषण यंत्र, बॉईल्स ऍपरेट्स, ऑटोक्लेव इत्यादी.
  - आपत्कालीन औषधे व औषधी द्रव्ये आणि शॉकवरील उपचाराची सुविधा (भारत सरकारने वेळोवेळी दिलेल्या सूचनांना अनुसरुन असलेली औषधे व औषधी द्रव्ये)
  - गरज पडल्यास, त्वरीत वाहतुकीची सोय,
  - गरज पडल्यास रक्त देण्याची सोय,

- **१३ ते २० आठवड्यापर्यंतच्या गर्भपातासाठी :**
  - गर्भपात करणाऱ्या सर्व सेवा पुरवठादारांकडे रूग्णांना दाखल करून घेण्याची सोय व रूग्णालय आणि शस्त्रक्रिया कक्षाची स्वच्छता राखण्याची सोय असणे जरुरी आहे.
  - स्त्री चिकित्सेसाठी/ परीक्षणासाठी/ प्रसूतीसाठी लागणारे टेबल
  - पोटाची किंवा स्त्री रोग चिकित्सेच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारी साधने
  - भूल देण्यासाठी व पुन्हा शुद्धीवर आणण्यासाठी लागणारी साधने व
  - निर्जंतुकीकरणासाठी लागणारी साधने, उदाहरणार्थ ऑक्सिजन सिलिंडर, शोषण यंत्र, बॉईल्स ऍपरेट्स, ऑटोक्लेव इत्यादी.
  - आपत्कालासाठी पुरेशी औषधे तसेच शिरेवाटे देता येणारी द्रवरुप औषधे उपलब्ध असावीत (भारत सरकारने वेळोवेळी दिलेल्या सूचनांना अनुसरून असलेली औषधे व औषधी द्रव्ये)
  - भूल देण्याकरता तसेच परत शुद्धीवर आणण्याकरता लागणारी साधनसामग्री
  - निर्जंतुकीकरणासाठी लागणारी साधनसामग्री
  - रूग्णालयापासून पाच किलोमीटरच्या आत रक्तपेढीची सोय असावी.

- **७ आठवड्यापर्यंतच्या गर्भपातासाठी :**

  सात आठवडयांपर्यंतचा गर्भपात वैद्यकीय पद्धतीने किंवा गर्भपातासाठी मिळणाऱ्या गोळ्यांद्वारे केला जाऊ शकतो.

कोणतेही नोंदणीकृत वैद्यकीय चिकित्सक ज्यांना ह्या पुस्तिकेतील नियम ३ मध्ये दिल्याप्रमाणे स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्रांत अनुभव व पात्रता असेल - ते ह्या गोळ्या लिहून देऊ शकतात. फक्त त्यांना गर्भपात कायद्याद्वारे संमत अश्या गर्भपात केन्द्राचा वापर उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सदर वैद्यकीय व्यावसायिकाने त्या मान्यताप्राप्त केन्द्राच्या मालकाकडून अशी सुविधा आपल्याला उपलब्ध असण्याविषयीचा दाखला घेऊन तो दर्शनी जागी लावणे देखील आवश्यक आहे.

## ६. गर्भपात केंद्रांना कोण मान्यता देते?

२००२ मध्ये सुरक्षित गर्भपाताच्या सेवांची उपलब्धता वाढविण्याकरिता कायद्यात सुधारणा केली गेली. यातील एक सुधारणा म्हणजे गर्भपात केंद्रांना मान्यता देण्याची प्रक्रिया अधिक जलद करण्याकरिता मान्यतेच्या अधिकाराचे राज्य पातळीवरुन जिल्हा पातळीवर केले गेलेले विकेंद्रीकरण.

सुरक्षित गर्भपात केंद्रांना मान्यता देण्याची व त्यांच्या कामकाजावर देखरेख करण्याची जबाबदारी जिल्हा पातळीवरील समितीवर आहे. या समितीमध्ये खालीलप्रमाणे तीन ते पाच सदस्य असावेत:

- जिल्हा आरोग्य अधिकारी (अध्यक्ष)
- स्त्रीरोग तज्ञ/शल्यचिकित्सक/भूलतज्ञ
- स्थानिक वैद्यकीय व्यावसायिक
- बिगरसरकारी संस्थेचे प्रतिनिधी
- जिल्ह्यातील पंचायत राज संस्थेचे प्रतिनिधी

या समितीमध्ये किमान एक स्त्री सदस्य असणे बंधनकारक आहे. समितीच्या सदस्यांचा कार्यकाल २ वर्षांचा असेल व बिगरसरकारी सदस्यांना जास्तीत जास्त दोन कार्यकालापर्यंत सदस्यत्व मिळू शकेल.

## ७. नोंदणीची कार्यालयीन प्रक्रिया कोणत्या प्रकारची असते?

- संस्थेच्या मालकाने किंवा प्रमुखाने संस्थेच्या नोंदणीसाठी "फॉर्म अ" मध्ये अर्ज करावा. (जोडपत्र १ पहा) अर्ज हा जिल्हास्तरीय समितीच्या अध्यक्षाला उद्देशून करावा.
- मुख्य वैद्यकीय अधिकारी अर्ज मिळाल्यापासून दोन महिन्याच्या आत जागेची तपासणी आणि नोंदीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची पडताळणी करून तसा अहवाल जिल्हास्तरीय समितीला देतो.
- जर संस्थेने नोंदणीसाठी आवश्यक घटकांची पूर्तता केली असेल तर त्या संस्थेला जिल्हास्तरीय समिती द्वारे, मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याने तपासणी केल्यापासून दोन महिन्याच्या आत फॉर्म ब (जोडपत्र २ पहा) व प्रमाणपत्र दिले जाते.
- नोंदणीचे प्रमाणपत्र हे दिसेल अशा ठिकाणी लावावे.

## ८. नोंदणीकृत केंद्रांच्या कामकाजावर कोण देखरेख करते?

कायद्यातील सुधारणेनुसार कायद्याच्या परिणामकारक कार्यवाहीसाठी जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या. जिल्हास्तरीय समिती ही सुलभ पद्धतीने नोंदणी करण्यास तसेच जिल्ह्यात पुरविल्या जाणाऱ्या गर्भपात सुविधांवर नियंत्रण ठेवण्यास जबाबदार असेल. सुरक्षित गर्भपात सेवा पुरविण्यास सक्षम नसलेल्या केंद्रांची नोंदणी रद्द किंवा निलंबित करण्याचे अधिकारही जिल्हा समितीला असतात.

## ९. कोणत्या प्रकारच्या नोंदी ठेवणे गरजेचे असते?

**ठेवायाच्या नोंदी :**

१. फॉर्म क : गर्भपातासाठी गर्भवतीचे संमतीपत्र (जोडपत्र ३).

२. फॉर्म १ : गर्भपाताचे प्रमाण (जोडपत्र ४).

३. फॉर्म २ : जिल्हास्तरीय समितीला पाठवायचे गर्भपाताचे मासिक विवरणपत्र (जोडपत्र ५).

४. फॉर्म ३ : प्रवेश नोंदवही (गोपनीय) (जोडपत्र ६)

**नोंदी ठेवण्याचे काही नियम :**

- "फॉर्म क" आणि "फॉर्म १" हे गोपनीयता राखण्यासाठी लिफाफ्यात बंद करून नोंदणीकृत दवाखान्याच्या प्रमुखाकडे पाठवेपर्यंत वैद्यकीय व्यावसायिकाने सुरक्षित ठिकाणी ठेवावे.
- सीलबंद केलेल्या लिफाफ्यावर प्रवेश नोंदवहीतील गर्भवतीचा अनुक्रमांक व गर्भपात करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांची नावे लिहावीत. तसेच त्यावर स्पष्टपणे "गोपनीय" असे दर्शवावे.
- सुविधा किंवा संस्थेच्या प्रमुखाने प्रत्येक महिन्याला गर्भपाताच्या केसेसचे विवरण "फॉर्म २" मध्ये त्याच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठवावे.
- प्रत्येक नोंदणीकृत संस्थेने प्रवेश नोंदवही "फॉर्म ३" प्रमाणे ठेवावी. ज्यामध्ये गर्भपात केलेल्या गर्भवतीची माहिती भरावी व ही नोंदवही अत्यंत गोपनीय असून ही नोंदवही शेवटची नोंद केल्यापासून पुढील पाच वर्षांपर्यंत जपून ठेवावी.
- प्रवेश नोंदवहीतल्या नोंदी ह्या अनुक्रमे करावयाच्या असून प्रत्येक नवीन कॅलेंडर वर्षात नवीन अनुक्रमांक सुरू करावा, जसे - १/२००७, २/२००७, १/२००८, २/२००८
- प्रवेश नोंदवहीशिवाय कोणत्याही प्रकारची नोंद इतर केसशीट, शस्त्रक्रिया विभाग नोंदवहीत करू नये. इतर नोंदीसाठी त्या स्त्रीचा प्रवेश नोंदवहीतील दिला गेलेला अनुक्रमांक वापरण्यात यावा.

- रूग्ण दाखल करण्याची नोंदवही ही गोपनीय असून त्यातील माहिती कायद्यानुसार अधिकार असलेल्या व्यक्ति व्यतिरिक्त कोठेही उघड करू नये. गरज पडल्यास ही माहिती फक्त मुख्य सर्जनला, कोणत्या खटल्याची चौकशी करत असलेल्या प्रथम श्रेणीच्या मॅजिस्ट्रेटला किंवा जिल्हा न्यायाधीशाला दिली जाऊ शकते.
- जरी असे असले तरी गर्भपात करून घेणाऱ्या स्त्रीला गर्भपाताच्या सुट्टीकरता लागणारे प्रमाणपत्र दिले जाऊ शकते.

## १०. यामध्ये काही अपवादात्मक बाबी असतात काय?

अतिशय अपवादात्मक परिस्थितीमध्ये जर गरोदर स्त्रीच्या जीवाला तातडीचा धोका संभवत असेल तर दोन नोंदणीकृत डॉक्टरांच्या मताशिवाय व गर्भधारणेचा कालावधी लक्षात न घेता कोणत्याही केंद्रामध्ये दवाखान्यामध्ये किंवा रूग्णालयामध्ये कायदेशीर गर्भपात केला जाऊ शकतो. अशा प्रकारच्या गर्भपाताची माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे गर्भपात केलेल्या दिवशीच (किंवा कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी) राज्याचे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना पाठविणे बंधनकारक असते.

## ११. याकरिता कोणत्या प्रकारची दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते?

या पुस्तिकेत नमुद केल्यानुसार नोंदणीकृत नसलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांवर किंवा मान्यताप्राप्त नसलेल्या केंद्रांमध्ये गर्भपाताची सेवा देणाऱ्या आरोग्य व्यावसायिक किंवा केंद्रचालकांवर केल्या जाणाऱ्या दंडात्मक कारवाईचे स्वरूप २००२ नंतर अधिक तीव्र करण्यात आले आहे. कायदाभंग करणाऱ्या गुन्हेगारांना याकरिता २ ते ७ वर्षापर्यंतची शिक्षा होऊ शकते.

## १२. अधिक माहिती :

गर्भपात कायदा नियम व मार्गदर्शक तत्त्वांविषयी अधिक माहितीकरिता :

- भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय http://mohfw.nic.in/MTP.htm
- महाराष्ट्र राज्य शासन, आरोग्य सेवा संचनालय http://www.maha-arogya.gov.in/actsrules/default.htm
- सेंटर फॉर एन्क्वायरी इंटू हेल्थ अँड अलाईड थिम्स (सेहत) - www.cehat.org
- Abortion and law : operationalizing district level committees under the MTP act in Madhya Pradesh, a GoMP-IPAS initiative, implementers' guide; New Delhi : IPAS, 2007
- The Medical Termination of Pregnancy act, 1971 : (as amended by The Delegated Legislation Provisions (Amendment) Act, 2004 (4 of 2005) Bare act with short notes; Delhi : Universal law publishing, 2007

# जोडपत्र १

## फॉर्म अ

*(नियम ५ मधील उपनियम २ पहा)*

कायद्यातील विभाग ४ मधील घटक २ नुसार नोंदणीसाठी करावयाचा अर्ज

नोंदणीकृत जागेचा प्रकार

अ. १२ आठवड्यापर्यंतच्या गर्भपातासाठी

ब. २० आठवड्यापर्यंतच्या गर्भपातासाठी

१. जागेचे नाव :

२. संपूर्ण पत्ता :

३. स्वयंसेवी संस्था/ खाजगी रूग्णालय/ शुश्रुषागृह/ इतर.

४. खालील सोयी उपलब्ध आहेत का ?

**प्रवर्ग अ :**

१. स्त्री चिकित्सेसाठी/ परिक्षणासाठी/ प्रसूतीसाठी लागणारे टेबल

२. भूल देण्यासाठी व पुन्हा शुद्धीवर आणण्यासाठी लागणारी साधने,

३. निर्जंतुकीकरणासाठी लागणारी साधने, निर्जंतुकीकरण करणारी यंत्रसामग्री,

४. आपत्कालीन औषधासहीत शॉकवरील उपचाराची सुविधा,

५. गरज पडल्यास, त्वरीत वाहतुकीची सोय,

**प्रवर्ग ब :**

१. पोटाची तपासणी तथा स्त्री चिकित्सेसाठी/ परिक्षणासाठी/ प्रसूतीसाठी लागणारे टेबल,

२. आपत्कालासाठी पुरेशी औषधे तसेच शिरेवाटे देता येणारी द्रवरूप औषधे उपलब्ध असावीत.

३. भूल देता येणारी तसेच परत शुद्धीवर आणण्यासाठी लागणारी साधनसामग्री,

४. निर्जंतुकीकरणासाठी लागणारी साधनसामग्री.

ठिकाण :

दिनांक :

संस्थेच्या प्रमुखाची सही

## प्रतिज्ञापत्रे

*(नोंदणीच्या अर्जाला अर्ज करताना जोडावीत)*

### ☞ सुविधेच्या मालकाने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र :

**अर्जासोबत वैद्यकीय व्यावसायिकाने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र**

मी ......................................., व ...................................

या संस्थेचा मालक या नात्याने असे जाहीर करतो की,

१. या संस्थेची जिल्हास्तरीय समितीकडे अधिकृतरित्या नोंदणी होईपर्यंत मी कोणत्याही वैद्यकीय गर्भपातास परवानगी देणार नाही.

२. अर्जामध्ये दर्शिवलेल्या रक्तपेढीतून जर गरज असताना रक्त मिळाले नाही तर ते इतर कोणत्याही रक्तपेढीतून उपलब्ध करून देण्याची माझी जबाबदारी राहील.

३. मी या संस्थेसाठी २४ तास उपलब्ध असेन व माझ्या गैरहजेरीत दुसऱ्या वैद्यकीय व्यावसायिकाला २४ तासासाठी उपलब्ध करेन.

ठिकाण :

दिनांक :

सही, नाव आणि शिक्का

### ☞ डॉक्टरांचे प्रतिज्ञापत्र

शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर (स्त्री रोग तज्ञ) (लेटर हेडवर छापण्यात यावे.)

मी डॉ. ..............................., स्त्री रोग तज्ञ, ............ या शैक्षणिक पात्रतेसह आणि .......... वर्षांच्या अनुभवासह जाहीर करतो की, मी .................. या ठिकाणी/ संस्थेमध्ये वैद्यकीय गर्भपात करण्यासाठी उपलब्ध असेन.

- आपत्कालीन स्थितीत गरज असताना मी २४ तास उपलब्ध असेन.

ठिकाण :

दिनांक :

सही, नाव आणि शिक्का

☞ **भूलतज्ञाचे प्रतिज्ञापत्र** (लेटर हेडवर छापण्यात यावे.)

मी ................................ भूलतज्ञ ........... या शैक्षणिक पात्रतेसह व ........... वर्षांच्या अनुभवासह जाहीर करतो की, मी डॉ. .............................................. यांनी ......................... या ठिकाणी/संस्थेमध्ये वैद्यकीय गर्भपात करण्यासाठी रूग्णांना भूल देण्याचे काम करीन.

- आपत्कालीन स्थितीत गरज असताना मी २४ तास उपलब्ध असेन.

ठिकाण :

दिनांक :

सही, नाव आणि भूलतज्ञाचा शिक्का

☞ **सहाय्यकाचे प्रतिज्ञापत्र** (लेटर हेडवर छापण्यात यावे.)

मी ................................, सहाय्यक ........... या शैक्षणिक पात्रतेसह व ..... वर्षांच्या अनुभवासह जाहीर करतो की, मी डॉ. .............................................. यांना ....................... या ठिकाणी/संस्थेमध्ये प्रत्येक वैद्यकीय गर्भपात करण्यासाठी सहाय्य करीन.

- आपत्कालीन स्थितीत गरज असताना मी २४ तास उपलब्ध असेन.

ठिकाण :

दिनांक :

सही, नाव आणि सहाय्यकाचा शिक्का

# जोडपत्र २

## फॉर्म ब

(नियम ५ चा उपनियम ६ पहा)

### नोंदणीचे प्रमाणपत्र

खाली नमूद केलेले ठिकाण गर्भधारणा समाप्ती कायदा, १९७१ (१९७१ चा ३४) नुसार नोंदणीकृत करण्यात येत आहे.

...................... आठवड्यापर्यंत वाचण्यात यावे.

जागेचे नाव :

संपूर्ण पत्ता व इतर वर्णन :

मालकाचे नाव :

ठिकाण :

दिनांक :

सेवार्थ .................... सरकार

# जोडपत्र ३

## फॉर्म क

(नियम २ पहा)

मी, ........................................, व .................................... यांची मुलगी/पत्नी ........... वर्षे वय असून माझा कायमचा पत्ता ..............................
व
सध्या ............................. येथे रहात असून .......... .......... ............. (गर्भपात केंद्राचे नाव) येथे माझा गर्भपात करण्यासाठी संमती देत आहे.

ठिकाण :

दिनांक :

सही

*(अज्ञान अथवा मनोरूग्णाच्या पालकाने भरावा.)*

मी, ......................... व ........................ यांचा मुलगा/मुलगी/पत्नी असून, माझे वय ......... वर्षे असून माझा कायमचा पत्ता .......................... आहे व मी आता ............................ इथे रहात आहे. माझी पाल्य .......................... जी अज्ञान/मनोरूग्ण आहे तिचा गर्भपात ........................ (गर्भपात केंद्राचे नाव) या ठिकाणी करण्यास मी संमती देत आहे.

ठिकाण :

दिनांक :

सही

# जोडपत्र ४

## फॉर्म १

(अधिनियम ३ नुसार)

मी ........................................................................................

मी, डॉ. ..................................................................................,

(नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाचे नाव शैक्षणिक पात्रता)

..............................................................................................

(पूर्ण पत्ता)

मी, डॉ. ..................................................................................,

(नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाचे नाव शैक्षणिक पात्रता)

..............................................................................................

(पूर्ण पत्ता)

असे प्रमाणित करतो की, ङमी/आम्ही प्रामाणिक हेतूने अशा मतापर्यंत पोहोचलो ङआहे/आहोत की, ..............................................................................

(गर्भवती स्त्रीचे पूर्ण नाव)

..............................................................................................

(पूर्ण पत्ता)

खाली दिलेल्या ङङकारणास्तव हिचा गर्भपात करणे गरजेचे आहे.

ङमी/आम्ही असे निदर्शनात आणू इच्छितो की, ङमी/आम्ही वरती दर्शविलेल्या स्त्रीचा गर्भपात केला असून तिचा दवाखान्याच्या/नोंदणीकृत जागेच्या प्रवेश नोंदवहीत ........... हा नोंदणी क्र. आहे.

ठिकाण :

दिनांक :

वैद्यकीय व्यावसायिकाची/व्यावसायिकांची सही

*लागू नसेल ते खोडावे.

**खालीलपैकी योग्य ते कारण निवडून लिहावे.

१. गर्भवती स्त्रीचे आयुष्य वाचविण्याकरता.

२. गर्भवती स्त्रीच्या शारीरिक तथा मानसिक आरोग्याला असलेला धोका रोखण्याकरिता.

३. असे निदर्शनात आले की, जन्माला येणाऱ्या मुलामध्ये शारीरिक तथा मानसिक व्यंग असण्याची शक्यता आहे.

४. गर्भधारणा ही बलात्कारामुळे झाली आहे.

५. गर्भधारणा ही विवाहीत स्त्रीने अथवा तिच्या पतीने वापरलेल्या कुटुंब नियोजन साधनांच्या निष्क्रियतेमुळे झाली आहे.

**टिप** : गर्भवती स्त्रीच्या शारीरिक तथा मानसिक आरोग्याचा धोका लक्षात घेताना तिच्या वस्तुत: तथा भविष्यातील वातावरणाचा विचार करण्यात यावा.

ठिकाण :

दिनांक :

वैद्यकीय व्यावसायिकाची/व्यावसायिकांची सही

# जोडपत्र ५

## फॉर्म २

(अधिनियम ४(५) पहा)

१. जिल्ह्याचे नाव:

२. नोंदणीकृत जागेचे नाव :

३. गर्भधारणेचा काळ (एकूण) :

अ. १२ आठवड्यापर्यंत

ब. १३ ते २० आठवड्यापर्यंत

४. धर्म :

१. हिंदू :

२. मुस्लिम :

३. ख्रिश्चन :

४. इतर :

५. एकूण :

५. गर्भनिरोधकास संमतीसह गर्भपात

अ. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया :

ब. तांबी :

६. गर्भपाताची कारणे : (प्रत्येक कारणापुढे एकूण संख्या द्यावी)

१. गर्भवतीच्या जीवाला धोका आहे :

२. गर्भवतीच्या शारीरिक आरोग्याला गंभीर धोका :

३. गर्भवतीच्या मानसिक आरोग्याला गंभीर धोका :

४. बलात्कारामुळे झालेली गर्भधारणा :

५. शारीरिक तथा मानसिक व्यंग असलेले मुल जन्माला येण्याची शक्यता :

६. गर्भनिरोधकाचा अयशस्वी वापर :

कार्यालयीन व्यवस्थापकाची दिनांकासह सही

# जोडपत्र ६

## फॉर्म ३

(अधिनियम ५ पहा)

## प्रवेश नोंदवही

(ही नोंदवही शेवटची नोंद केल्यापासून पाच वर्षानंतरच नष्ट करावी)

| अ.क्र. | प्रवेश दिल्याची तारीख | गर्भवती स्त्रीचे नाव | पालकाचे नाव | वय | धर्म | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

| गर्भधारणेचा काळ | गर्भपात करण्याचे कारण | गर्भपाताची तारीख | रूग्णालयातून सोडल्याची तारखी | शेरा | गर्भपात करण्यासाठी मते घेतलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांची नावे | गर्भपात करणाऱ्या व्यावसायिकांचे नावे |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | |

जगातील करोडों स्त्रिया नको असलेला गर्भ पाडण्यासाठी आपले आरोग्य व कधीकधी आपला जीवही धोक्यात टाकतात. जागतिक आरोग्य संघटनेद्वारे दिलेल्या आकडेवारी प्रमाणे दर दिवशी ५५,००० असुरक्षित गर्भपात करवले जातात. त्यापैकी ९५% गर्भपात विकसनशील देशात केले जातात आणि त्यामुळे दर दिवशी २०० स्त्रिया दगावतात. ( WHO, Unsafe Abortion : Global and Regional Estimates of Incidence of and Mortality due to Unsafe Abortion with a Listing of Available Country Data - Geneva : WHO, 3rd edition, 1997 )

# सेहत

'सेहत' (सेंटर फॉर इनक्वायरी इनटू हेल्थ अँड अलाईड थीम्स्) हे अनुसंधान ट्रस्टचे संशोधन केंद्र आहे. आरोग्य विषयक लोकाभिमुख संशोधन व सामाजिक कार्य करण्यासाठी १९९१ साली सेहतची स्थापना झाली. आरोग्य व आरोग्य सेवा हा जनतेचा हक्क आहे, हा समज समाजात घट्ट व्हावा या दिशेने सेहतचे संशोधन व इतर सामाजिक कार्य चालते. सेहतने १९९४ पासून सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या खालील चार पैलूंवर प्रकल्प हाती घेतले आहेत - आरोग्य-सेवा व त्याचे अर्थकारण, आरोग्य-विषयक कायदे व नैतिकता, रुग्णांचे हक्क, स्त्रियांचे आरोग्य प्रश्न, स्त्रियांविरुद्ध हिंसा व मानवी अधिकार.